महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, बीड

खंडेश्वरी मंदिर जवळ, नाथापुर रोड, बीड-431122
दूरध्वनी क्र.-(02442)222603, फॅक्स-222609
ई-मेल- principal.gpbeed@dtemaharashtra.gov.in संकेतस्थळ-www.gpbeed.ac.in

DTE CODE:- 2011 "Vision:- *To make competent Engineering Professional with Ethical core Values.*" MSBTE CODE:- 0032

जा.क्र.शातंबी/केंभावि /रद्दी विक्री/२०२५-२६/०१

दिनांक-: [illegible]1 JAN 2026

## रद्दी विक्रीकरिता पुनर्निविदा सूचना

शासकीय तंत्रनिकेतन, बीड या संस्थेतील मुद्रण, यंत्र अभियांत्रिकी, उपयोजित यंत्र, स्थापत्य व विज्ञान इ. विभागातील रद्दी विक्रीकरिता यापूर्वी प्रसिद्ध केलेली निविदा प्रक्रिया अपरिहार्य कारणास्तव रद्द करण्यात आली आहे. आता सुधारित अटींनुसार नोंदणीकृत खरेदीदारांकडून खालील रद्दी प्रकारांसाठी एकत्रित मोहोरबंद निविदा मागवण्यात येत आहेत.

दरपत्रक

| अ.क्र. | रद्दीचा प्रकार | दर प्रति किलोग्राम रुपयात |
|---|---|---|
| ०१ | मासिक/नियतकालिके/प्रात्याक्षिक निदेशपुस्तक रद्दी(लॅब | |
| ०२ | सुटी-पाने रद्दी | |
| ०३ | कार्ड बोर्ड | |

निविदा सोबत जोडा वयाची आवश्यक कागदपत्रे

०१. आस्थापना/दुकान नोंदणी प्रमाणपत्र.
०२. रद्दी खरेदीबाबत अधिकृत परवाना.
०३. वस्तु व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र.(GST Registration certificate)
०४. वस्तु व सेवाकर जुलै २०२५ किंवा अखेरच्या तारखेचे किंवा शेवटचे मंजुरी (clearance) प्रमाणपत्र.

अटी व शर्ती

०१. उपरोक्त दर आपल्या आस्थापना/दुकान लेटरहेडव सही शिक्यासह नोंदवावेत.
०२. निविदाकारांनी उक्त नमुद आवश्यक कागदपत्रे निविदा दरपत्रकासोबत असने आवश्यक आहे.
०३. सिलबंद पाकिटावर रद्दी खरेदी करिता निविदा असे स्पष्ट नमुद करावे.
०४. खरेदीदाराने त्यांची निविदा आवश्यक कागदपत्रासह तसेच प्रस्थावीत केलेले खरेदी दरपत्र एकाच सिलबंद पाकिटात दिनांक. ०७ जानेवारी २०२६ वेळ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत पोहचतील असे पाठवावीत.
०५. निविदाकारांनी वरील सर्व रद्दी प्रकारांसाठी एकत्रितपणे (Combine) दर देणे बंधनकारक आहे.
०६. नैसर्गिक न्यायानुसार, सर्व रद्दी प्रकारांसाठी एकत्रितपणे सर्वात जास्त दर (Highest Bidder) देणाऱ्या निविदाकारास प्राधान्य दिले जाईल.
०७. वेगवेगळ्या निविदाकारांनी वेगवेगळ्या रद्दी प्रकारांसाठी वेगवेगळे दर दिले असल्यास, ज्या निविदाकाराच्या दरामुळे शासनास सर्वाधिक एकूण महसूल प्राप्त होईल, अशाच निविदाकाराचा विचार केला जाईल.
०८. सर्वाधिक दर देणाऱ्या निविदाकारास वाटाघाटीसाठी बोलावले जाऊ शकते. जर संबंधित निविदाकाराने दर कमी करण्यास असमर्थता दर्शवली, तर दुसऱ्या क्रमांकाच्या (L-2) निविदाकारास संधी देण्याबाबत विचार केला जाईल.
०९. रद्दीची मोजणी हि संस्थेतील इलेक्ट्रॉनिक वजन काट्यावर नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रात्यक्ष उपस्थितीत करण्यात येईल.

१०. रद्दीची खरेदी केल्यानंतर होणारी रक्कम आणि त्यावर लागणारा वस्तु व सेवाकर नियमानुसार रोखपाल,रोखा विभाग यांच्या कडे रद्दी हस्तांतरित करण्यापूर्वी जमा करावी लागेल.

११. निविदा उघडण्याचा दिनांक. ०७ जानेवारी २०२६ वेळ सायंकाळी ०४.०० वाजता.

१२. उशिराने प्राप्त निविदा कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत.

१३. ही निविदा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार 'प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, बीड' यांच्याकडे राखीव राहतील.

(डॉ.अ.कि. वाघमारे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन,बीड

प्रत: ०१. संस्थेतील मुख्य सुचना फलक

०२. संस्थेची वेब पोर्टल वर निविदा प्रसिद्धीकरिता संस्थेचे संकेतस्थळ प्रभारी अधिकारी.